# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४३७/२०१९**

**तक्रारकर्ता ॲड. संजय आर हरीतवाल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक (अति / निष्का) बांद्रा-२**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, ए विंग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, ए विंग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.१२.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/०००६४६ प्रकरणी आयोगाने दि.०२.०५.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना ७ दिवसांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वयेमुद्देनिहाय उपलब्ध माहितीनिशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २५.०९.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बांद्रा- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.१८.१०.२०१९ रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा भूमापक (अति/निष्का) बांद्रा- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. २५.११.२०१९ व जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक (अति/निष्का) बांद्रा- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. ०८.०१.२०२१ रोजी आयोगास सादर केला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्त्याने आयोगास सादर केले की, त्यांना आयोगाच्या आदेशाप्रमाणे माहिती देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी तक्रारकर्त्यास माहिती उपलब्ध करुन आयोगास दि. ०८.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. तक्रारकर्त्यांनी आयोगास असे सादर केले की, सदर माहितीचा संबंध आयोगाच्या आदेशाशी नाही.

तक्रारकर्ता यांनी असे नमूद केले की, त्यांना दि. २१.०५.२०१८ ते १९.१०.२०१८ या कालावधीमध्ये विविध तारखांवर झालेल्या सुनावणीमध्ये उपस्थिती विषयी संबंधीत रजिस्टरची प्रत तसेच रोजनाम्याची प्रत इ. पाहिजे होती.

जन माहिती अधिकारी यांनी मौखिकरित्या आयोगास सादर केले की, सदर प्रकारची माहिती त्यांचे कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा मूळ माहितीचा अर्ज दि. २६.१२.२०१८ मधील नमूद मुद्यांतील माहिती जर त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसेल तर तसेच स्पष्टपणे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्रावर सादर करुन पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०१.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

27-12-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.१२.२०२४**

07 JAN 2025

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४३७/२०१९**
**तक्रारकर्ता ॲड. संजय आर हरीतवाल**
**सुनावणी दिनांक : २७.०१.२०२५ (In continuation of order dt २७.१२.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी दिनांक २७.१२.२०२४ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले होते:

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या मूळ माहितीचा अर्ज दिनांक २६.१२.२०२८ मधील नमूद मुद्दयांतील माहिती जर त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसेल तर तसे स्पष्टपणे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्रावर सादर करुन पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. पुढील सुनावणी दिनांक २७.०१.२०२५ रोजी घेण्यात येईल.

उक्त आदेशान्वये आज झालेल्या सुनावणीस तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दिनांक २७.०१.२०२५ आयोगास सादर केले. त्यांनी आयोगास निवेदन केले की, त्यांनी अपिलार्थी यांना ०५ मार्च २०१९ रोजी माहिती दिलेली होती. सदर पत्रावरुन आयोगाचे आदेश दिनांक ०२.०५.२०१९ चे अनुपालन होत नाही. कारण दि.०२.०५.२०१९ रोजी झालेल्या द्वितीय अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी नमूद केले होते की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही म्हणून आयोगाने दि. ०२.०५.२०१९ रोजी अपिलार्थी यांना सात दिवसांचे आत मुद्देनिहाय माहिती नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश देऊन अपील निकाली काढलेले होते.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्याकडे सध्या उपलब्ध अभिलेखाचे तक्रारकर्त्यास निरीक्षण करुन देण्यास ते तयार आहेत. सुनावणी दरम्यान तक्रारकर्त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखाचे निरीक्षण केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, याशिवाय काही अभिलेख त्यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाचे निरीक्षण करणेचे मान्य केले.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास सदर प्रकरणाविषयी अभिलेख निरीक्षणासाठी कार्यालयात पत्राद्वारे बोलावून अभिलेख निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावेत व निरीक्षणांती त्यांना हव्या असलेल्या अभिलेखाची छायांकीत प्रत नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०२.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai

Sd/- 27-1-2025

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : २७.०१.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**